**शब्दकोशांचे प्रदर्शन:१२ ऑगस्ट २०२२ ते १३ ऑगस्ट २०२२**

विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने सुरु असलेल्या उत्सव 75 च्या अंतर्गत शब्दकोशाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ एस आर रंगनाथन आणि भारतीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य देखील या ग्रंथप्रदर्शनामागे आहे . विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ विजय बेडेकर यांच्या प्रेरणेने भरविलेल्या या प्रदर्शनाचे उद्‌घाटन जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते आज शुक्रवार दिनांक 12 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी दहा वाजता करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उदघाटन प्रसंगी बोलतांना प्राचार्या नाईक म्हणाल्या की शिक्षण आणि संशोधनामध्ये विविध प्रकारच्या शब्दकोशांना अतिशय महत्व आहे. एखाद्या भाषेतील वापरात असलेल्या तसेच वापरातून गेलेल्या अशा यच्चयावत शब्दांचा संग्रह शब्दकोशांमध्ये असतो.शब्दांचा अर्थ समजावा आणि जिज्ञासूची शब्दशक्ती वाढावी, हा एक हेतू शब्दकोशरचनेमध्ये असतो. पुढे त्या म्हणाल्या की शब्दकोशामुळे

मूळ शब्द व त्याचा अर्थ समजण्यास मदत होते शब्दकोशामध्ये सामान्यतः शब्द, त्याचा अर्थ त्या शब्दाचा प्रतिशब्द, तसेच इष्ट तेथे अर्थाचे अधिक विशदीकरण दिलेले असते. सर्वच विषयांचचा त्याचप्रमाणे विविध वाङ्मयांचा अभ्यास करण्यासाठी शब्दकोश महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले .

या प्रदर्शनामध्ये मराठी इंग्रजी हिंदी आणि संस्कृत भाषेतील 400 शब्ब्दकोशांचा समावेश आहे . 20 खंडांमध्ये असलेली ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी ,मोलसवर्थचा शब्दकोश, ऑक्सफर्ड ने 60 खंडामध्ये प्रकाशित केलेला चरित्रात्मक शब्दकोश पाल्ग्रेव्ह चा अर्थशास्त्र शब्दकोश, संज्ञा संकल्पना कोष त्याचप्रमाणे विविध विषयासाठी असलेले शब्दकोश, महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले सर्व परिभाषा कोष, शासन व्यवहारकोश इत्यादी महत्वपूर्ण शब्दकोश या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे .

या प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा सुभाष शिंदे,डॉ महेश पाटील, डॉ प्रियंवदा टोकेकर, हर घर तिरंगा आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव समितीचे समन्वयक डॉ दीपक साबळे ,सर्व विभाग प्रमुख, सर्व ग्रंथालय कर्मचारीआणि ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल नारायण बारसे यांनी प्रदर्शनाची भूमिका विशद करून सर्वांचे स्वागत केले .

हे शब्दकोश प्रदर्शन शनिवार दि 13 ऑगस्ट पर्यंत सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत सर्व ठाणेकरांची खुले असणार आहे .




Vidya Prasarak Mandal's
K. G. Joshi College of Arts and
N.G. Bedekar College Of Commerce (Autonomous), Thane
आज़ादी का अमृत महोत्सव
HAR GHAR TIRANGA
9th - 17th August 2022
Accredited 'A' Grade by NAAC in Third Cycle
Best College Award (University of Mumbai)
ISO 9001:2015
Year of Establiment :1969
Glorious "Fifty Years of Higher Education"
Asia Today Media and Research Best College Award for the year 2020-21 and 2021-22
Book Exhibit
12th August,




Keep
Silence Please


Keep
Silence Please